**तालुका दिंडोरी येथील जिल्हा परिषद पालखेड बंधारा शाळेसाठी HAL कडून सीएसआर च्या माध्यमातून तीन कोटी रुपये निधी**. (दि. २४-११-२०२५)



हिंदुस्तान एरोनॉटिक लिमिटेड (HAL)नाशिक यांच्या सीएसआर फंडामधून जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श मॉडेल स्कूल पालखेड बंधारा तालुका दिंडोरी यास 12 वर्ग खोल्या, 1 मुख्याध्यापक कार्यालय ,1 स्टाफ रूम, मुले व मुली यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागृह मंजूर करण्यात आलेली आहे सदर कामासाठी 3 कोटी CSR निधीची तरतूद HAL कडून करण्यात आलेली आहे.

नवीन इमारत भूमिपूजन सोहळा आज दिनांक 25 /11 /2025 वार मंगळवार रोजी सकाळी 10:00 वाजता दिंडोरी लोकसभेचे खासदार माननीय श्री भास्करजी भगरे सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय श्रीरामजी शेटे साहेब चेअरमन कादवा सहकारी साखर कारखाना ,माननीय श्री सुब्रत मंडल जनरल मॅनेजर HAL , कुमार साहेब डीजीएम व त्यांची सर्व टीम, पंचायत समिती दिंडोरी गटविकास अधिकारी श्री भास्करजी रेगडे, दिंडोरी तालुका पोलीस निरीक्षक श्री रघुनाथ शेगर साहेब, दिंडोरी गटशिक्षणाधिकारी श्री भाऊसाहेब चव्हाण ,विस्तार अधिकारी श्री कैलास पगार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला यावेळी गावच्या सरपंच सौ रेखाताई गांगोडे, उपसरपंच शालिग्राम (बबलू ) गायकवाड व सर्व सदस्य ,ग्रामसेवक व त्यांचे सर्व कर्मचारी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रामनाथ पीठे ,उपाध्यक्ष लहानु वाघ व सर्व सदस्य, पालखेड बंधारा शाळेचे मुख्याध्यापक श्री खैरनार सर ,सर्व शिक्षक ,गावातील सर्व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.